# Conviction in Riot Case

Conviction in Dhule Taluka PS riot Case.

## अजनाळे येथील 10 जणांना सक्तमजुरी

### एकास मारहाण करुन केली होती दंगल

**धुळे :** दंगल करुन मारहाण केल्याप्रकरणी अजनाळे येथील १० जणांना येथील अतिरिक्त जिल्हा न्या. प्रदीप एस.काळे यांनी सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली आहे.

तालुक्यातील अजनाळे गावात २०१२ मध्ये शरद भिमराव चव्हाण यांना जातीवाचक शिवीगाळ, जबरी लूट, मारहाण करुन दंगल केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी जितेंद्र निंबा राजपूत, गोरख उर्फ लहू निंबा राजपूत, मदनसिंग उर्फ आबा फत्तेसिंग राजपूत, संजय जयसिंग राजपूत, आबा उर्फ अंकुश निंबा राजपूत, दमनसिंग फत्तेसिंग राजपूत, सचिन उर्फ चरणसिंग गणसिंग राजपूत, सपनाबाई जितेंद्र राजपूत, सुलाबाई निंबा राजपूत, सुंदरबाई संजय राजपूत सर्व रा.अजनाळे या १० जणांविरुध्द तालुका पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३९५, १४९, ३२४, ३३७, ३३७, ३३८, अनूसूचित जाती जमाती कायदा कलम ३ (१) (१०) अन्वये गुन्हा दाखल झाला होता. या खटल्याचे कामकाज येथील अतिरिक्त जिल्हा न्या.प्रदीप एस.काळे यांच्या न्यायासनासमोर चालले. न्या.काळे यांनी वरील १० आरोपींना भादंवि कलम १४३, १४७, १४८, ३२३, ३२४, १४९ अन्वये आरोप सिध्द झाल्याने कलम १३५ (२) अन्वये शिक्षा सुनावली. यात भादंवि कलम १४३ अन्वये सहा महिने सक्तमजुरी, १४७ अन्वये एक वर्ष, १४८ अन्वये दोन वर्ष, ३२३ अन्वये सहा महिने शिक्षा ठोठावली आहे. तसेच ५०० रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना साधी कैद, ३२४ मध्ये दोन वर्षे या शिक्षा दिल्या आहेत. तसेच भादंवि कलम ३९५, ३३६, ३३७, ५०४, ५०६, १४९ व अॅट्रॉसिटीचे कलम ३ (१)(१०) व नागरी हक्क संरक्षण कायदा कलम (७)(१)(ड) यामध्ये कलम २३५ अन्वये दोषमुक्त केले आहे. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपअधीक्षक व्ही.एल. गडकरी यांनी केला होता. सरकारी वकील व्ही.बी. मोरे यांनी कामकाज पाहिले.